ePaper
**मुख्यमंत्री दिल्ली दौऱ्यावर, पंतप्रधानांसोबत महत्त्वाची बैठक, विविध विकास कामांवर चर्चा**




| वर्ष - 8 | अंक - 237 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™



धुलीवंदनानिमित्त शुक्रवार दिनांक 14 मार्च 2025 रोजी महाईन्यूज कार्यालयास सुटी असल्यामुळे शनिवार दिनांक 15 मार्च रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची आमचे वाचक, जाहिरातदार, हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

- संपादक

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 14 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## खोदकामात आठ कलश, मानवी हाडे, केस

# बापरे! ‘लीलावती’ मध्ये चक्क जादूटोणा!

## प्रशासनाने आरोप फेटाळले! मृतदेह जिवंत करून दाखवण्याचे आव्हान स्वीकारणारा महाभाग ; कोर्टाकडून गंभीर दखल

। मुंबई-पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**मुंबईतील प्रतिष्ठित ‘लीलावती रुग्णालया’ त यापूर्वी आर्थिक घोटाळ्यांची प्रकरणे चव्हाट्यावर आली होती. पण, आता त्या ठिकाणी चक्क मंत्रतंत्र किंवा जादूटोण्याचे प्रकार सुरू असल्याचे पुढे आले आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा गंभीर आरोप लीलावती रुग्णालयाच्या विश्वस्तांकडून माजी विश्वस्त आणि इतरांच्या विरोधात करण्यात आला आहे.**




### ‘ईडी’ कडे अधिकृत तक्रार..

विश्वस्तांशी संपर्क साधला असता, काही माजी विश्वस्त आणि इतरांच्या विरोधात आपण अंमलबजावणी संचनालयाकडे (ईडीकडे) तक्रार दाखल केल्याचेही त्यांच्या प्रवक्त्याकडून सांगण्यात आले.

### कार्यकारी संचालकांची कबुली

यासंदर्भात ‘लीलावती’ चे कार्यकारी संचालक परमबीर सिंह यांच्याशी माध्यमांनी संपर्क साधला. त्यावेळी त्यांनी कबूल करून टाकले, की आपल्याला काही कर्मचाऱ्यांनी सांगितले, की मी ज्या खोलीत बसतो, त्या फ्लोअरखाली काही जादूटोण्याच्या गोष्टी ठेवण्यात आल्या आहेत.

### व्हिडिओग्राफी करत खोदकाम !

सिंह पुढे म्हणाले, की शेवटी आम्ही काही साक्षीदार बरोबर घेतले, खबरदारी घेतली आणि व्हिडिओग्राफी करत ते फ्लोअर खोदून काढले. त्यावेळी त्यात जादूटोण्यासाठी वापरण्यात येणारे आठ कलश, काही मानवी हाडे, मानवी केस आणि तांदूळ सापडले. ही सर्व सामग्री जादूटोण्यासाठी वापरण्यात येत होती. मृत्यू पावलेल्या व्यक्तीला पुन्हा जिवंत करण्याचे आश्वासन देऊन हा जादूटोणा केला जात होता.

### माजी विश्वस्तांविरोधात गंभीर आरोप

मुंबईच्या वांद्रे परिसरात असलेल्या प्रसिद्ध लीलावती रुग्णालयाची देखभाल कीर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्ट कडून करण्यात येते आणि याच ट्रस्टने माजी विश्वस्तांविरोधात आरोप केले आहेत.

ट्रस्टने दिलेल्या माहितीनुसार लीलावती कीर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्ट यांनी थेट ईडी कडे अधिकृतपणे तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत शेकडो कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोपदेखील करण्यात आला आहे.

### माजी विश्वस्तांकडून विश्वासघात

ट्रस्टचे स्थायी निवासी प्रशांत मेहता यांनी माध्यमांना जी माहिती दिली आहे ती थक्क करणारी आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की आम्ही लीलावती कीर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्टची अखंडता जपण्यासाठी आणि आरोग्य सेवेसाठी दिलेला प्रत्येक रुपया दररोज आमच्यावर अवलंबून असलेल्या हजारो रुग्णांच्या कल्याणासाठी वापरला जाईल, याची खात्री देतो. दरम्यान, फॉरेन्सिक ऑडिटमध्ये उघड झालेले मोठे गैरव्यवहार आणि आर्थिक घोटाळे हे केवळ माजी विश्वस्तांवर असलेल्या विश्वासाचा विश्वासघात नाही तर आमच्या रुग्णालयाच्या मुख्य ध्येयाला थेट छेद दिला गेला आहे.

दरम्यान, या मोठ्या रुग्णालयाचा ताबा मिळवण्यावरून हे सर्व राजकारण सुरू असावे, आणि त्यातून पूर्वीचे विश्वस्त आणि आत्ताचे विश्वस्त यांच्यात जुंपली असावी, असा काहींनी निष्कर्ष काढला आहे.

### प्रख्यात ‘लीलावती’ मधील अनिष्ट चालीरीती..

लीलावती रुग्णालयातील काही पूर्वीचे प्रकार तेथील कर्मचाऱ्यांनी ओक्साबोक्षी रडत सांगितले. दि. २७ जानेवारी २०२१ रोजी जादूटोणा करणाऱ्यांनी मृत पावलेल्या एका मुलीच्या पालकांना सांगितले होते, की आम्हाला एक दिवस द्या मुलीचामृतदेह इथेच ठेवा त्या जिवंत होतील, याची खात्री देतो. दि. २३ ऑगस्ट २०२१ रोजी जादूटोण्याच्या संशयावरून सात जणांना खांबाला बांधून अमानुष मारहाण झाली होती. त्याचप्रमाणे त्याचप्रमाणे दि. ८ मार्च २०२२ महिलांच्या अंगात भानामती किंवा देवी आल्याचा प्रकार घडला होता.खोदकामात आठ कलश, मानवी हाडे, केस ; प्रशासनाने आरोप फेटाळले !

### जेजुरी हे तीर्थक्षेत्र असल्याने महत्त्वाचे ठिकाण

# दिल्ली गोवा एक्सप्रेसला मिळाला जेजुरी थांबा!

## हजरत निजामुद्दीन गोवा एक्सप्रेसला जेजुरी थांबा मंजूर केला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे कोल्हापूर लोहमार्गावरून धावणारी हजरत निजामुद्दीन गोवा एक्सप्रेस ही अति जलद धावणारी रेल्वे आता एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून जेजुरी रेल्वे स्थानकात अल्पवेळ थांबणार आहे, अशा प्रकारचे नियोजन रेल्वे प्रशासनातर्फे सुरू असल्याची माहिती मध्य रेल्वे विभाग व्यवस्थापक धर्मवीर मीना, पुणे विभाग व्यवस्थापक राजेश कुमार वर्मा, पुणे आरपीएफच्या प्रियंका शर्मा यांनी दिली .**




खंडोबाच्या देवदर्शनासाठी राज्यातील भाविकांबरोबरच इतर राज्यातून अनेक भाविक येतात परंतु रेल्वे स्थानकावर सर्व गाड्या थांबत नसल्याने भाविकांची गैरसोय होती. रेल्वे स्टेशन परिसरातील स्थानिक कार्यकर्त्या माजी नगरसेविका आमीना पानसरे, रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष विजय खोमणे, गणेश आबनावे व ग्रामस्थांनीनिजामुद्दीन एक्सप्रेसला जेजुरीत थांबा मिळावा यासाठी शासन दरबारी प्रयत्न केले होते. अखेर त्यांच्या प्रयत्नाला यश आले असून रेल्वे प्रशासनाने याची दखल घेतली आहे. जेजुरी हे तीर्थक्षेत्र आहेच ,परंतु या ठिकाणी औद्योगिक वसाहत असल्याने ही गाडी थांबण्याचा उद्योजकांनाही चांगला फायदा होणार आहे . सध्या पुणे ते कोल्हापूर लोहमार्गावर धावणारी सह्याद्री एक्सप्रेस पुढील महिन्यापासून मुंबईपर्यंत धावणार असल्याची माहिती रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली या लोहमार्गावरील विकास कामांचा आढावा घेण्यासाठी रेल्वे प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नुकतीच आळंदी (म्हातोबाची) या रेल्वे स्थानकाला भेट दिली. यावेळी जेजुरीतील कार्यकर्त्यांच्या शिष्ट मंडळाने त्यांची भेट घेऊन चर्चा केली. जेजुरी हे तीर्थक्षेत्र असल्याने महत्त्वाचे ठिकाण आहे. रेल्वे स्थानकापासून 14 किलोमीटर अंतरावर अष्टविनायकातील मोरगावचा गणपती आहे. खंडोबाच्या दर्शनासाठी प्रामुख्याने कर्नाटक, आंध्र ,तेलंगणा ,राजस्थान, गुजरात येथून भाविक मोठ्या प्रमाणात येतात ,मात्र या ठिकाणी सर्व गाड्या थांबत नसल्याने भाविकांना इतर खाजगी गाड्यांचा वापर करावा लागतो.या मार्गावरून वंदे भारत ,दिल्ली -गोवा जोधपुर-मंगळूर कोल्हापूर -अहमदाबाद, महालक्ष्मी, लोकमान्य नगर-हुबळी ,यशवंतपूर -हुबळी अशा अनेक लांब पल्ल्याच्या अति जलद रेल्वे गाड्या धावतात मात्र जेजुरीत त्यांना थांबा नाही. यामुळे भाविकांची ,औद्योगिक वसाहती मधील कामगारांची अत्यंत गैरसोय होते .या ठिकाणी सर्वच लांब पल्ल्याच्या गाड्या थांबवाव्यात अशी मागणी येथील लोकप्रतिनिधींची आहे.रेल्वे प्रशासनाने याची दखल घेऊन आता हजरत निजामुद्दीन गोवा एक्सप्रेसला जेजुरी थांबा मंजूर केला आहे. या निर्णयाचे जेजुरी व औद्योगिक वसाहतीमध्ये स्वागत करण्यात आले आहे.

### खाजगी गाड्यांचा वापर करावा लागतो

जेजुरी पासून रेल्वे स्थानक अडीच किलोमीटर अंतरावर असून रेल्वे गाडीने पुणे ,मुंबई ,कोल्हापूर आदी भागातून दररोज मोठ्या संख्येने भाविक खंडोबाच्या देवदर्शन साठी येत असतात.सोमवती अमावस्या यात्रेत श्री खंडोबा देवाची पालखी कऱ्हा नदीवर स्नानासाठी नेली जाते.कऱ्हा नदीवर जात असताना धोकादायक पद्धतीने रेल्वे रूळ ओलांडून पालखी न्यावी लागते.

---

### सायलेन्सरवर वाहतूक पोलिसांकडून 'बुलडोझर'

## वाहतूक शाखेच्या कार्यालयात 1768 सायलेन्सर नष्ट

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**फटाक्यांसारखा आवाज काढणारे कर्कश सायलेन्सरचा वापर करणाऱ्या बुलेटचालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहतूक पोलिसांनी शहराच्या वेगवेगळ्या भागात बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करुन फटाक्यासारखे आवाज काढणारे सायलेन्सर जप्त केले. येरवड्यातील वाहतूक शाखेच्या कार्यालयात जप्त केलेल्या एक हजार ७६८ सायलेन्सरवर बुलडोझर चालविण्यात आला. पोलिसांच्या कारवाईचे नागरिकांनी कौतूक केले आहे.**




रात्री अपरात्री शहर,तसेच उपनगरात भरधाव वेगाने बुलेटचालक तरूण जातात. बूलेटच्या सायलेन्सरमध्ये फेरफार (मॉडिफाय) करण्यात आल्याने त्यातून फटाक्यासारखा आवाज निघतो. फटाक्यासारख्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून पोलिसंनी शहरातील वेगवेगळ्या भागात बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करुन त्यांचे सायलेन्सर जप्त केले होते. कर्कश सायलेन्सर नष्ट करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी दिले होते.त्यानंतर पोलिसांनी जप्त केलेल्या एक हजार ७६८ सायलेन्सरवर 'बुलडोझर' चालवून नष्ट केले. या वेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, पोलीस निरीक्षक सुनील गवळी आणि वाहतूक शाखेतील अधिकारी उपस्थित होते. फटाक्यासारखा आवाज काढणारे, तसेच चित्रविचित्र आवाज काढणारे सायलेन्सर बसविल्यास पोलिसांकडून जप्त करण्यात येणार आहे. अशा प्रकारच्या सायलेन्सरचा वापर करणाऱ्या दुचाकीस्वार, बुलेटचालकांविरुद्ध यापुढील काळात तीव्र कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस उपायुक्त अमोल झेडे यांनी दिला आहे.कर्कश सायलेन्सरचा वापर करणारे वाहनचालक, तसेच सायलेन्सर विक्री करणारे व्यावसायिक, तसेच सायलेन्सर बसवून देणारे गॅरेजचालकांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे. यापुढील काळात ही कारवाई तीव्र करण्यात येणार असल्याचा इशारा वाहतूक शाखेचे उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिला आहे.रात्री अपरात्री शहर,तसेच उपनगरात भरधाव वेगाने बुलेटचालक तरूण जातात. बूलेटच्या सायलेन्सरमध्ये फेरफार (मॉडिफाय) करण्यात आल्याने त्यातून फटाक्यासारखा आवाज निघतो. फटाक्यासारख्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून पोलिसंनी शहरातील वेगवेगळ्या भागात बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करुन त्यांचे सायलेन्सर जप्त केले होते.

### चालकांविरुद्ध कारवाई करण्यात येणार

पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी दिले होते.त्यानंतर पोलिसांनी जप्त केलेल्या एक हजार ७६८ सायलेन्सरवर 'बुलडोझर' चालवून नष्ट केले. या वेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, पोलीस निरीक्षक सुनील गवळी आणि वाहतूक शाखेतील अधिकारी उपस्थित होते.

## पिंपरीत महावितरणच्या

# दोन उपकेंद्रांना ‘आयएसओ’!

### निकष पूर्ण करण्यात यशस्वी; उपकेंद्रांच्या आधुनिकीकरणासोबतच राखली योग्य निगा व गुणवत्ता

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



**पिंपरी चिंचवड | महावितरणच्या पुणे परिमंडल अंतर्गत आणखी दोन उपकेंद्रांनी ‘आयएसओ ९००१:२०१५’चे मानांकन मिळविले आहे. पिंपरी विभागातील गणेशम् स्विचिंग स्टेशन व म्हाडा उपकेंद्राने मानांकनाचे निकष पूर्ण केल्याबद्दल मुख्य अभियंता राजेंद्र पवार व ‘आयएसओ’चे परीक्षक नंदकुमार देशमुख यांच्याहस्ते या उपकेंद्रांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. आतापर्यंत पुणे परिमंडलातील नऊ उपकेंद्रांनी ‘आयएसओ’चे प्रमाणपत्र मिळविले आहे.**

मोरवाडी येथे आयोजित कार्यक्रमात या दोन्ही उपकेंद्रांना ‘आयएसओ ९००१:२०१५’चे मानांकनाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड, कार्यकारी अभियंता सोमनाथ मुंडे यांची उपस्थिती होती. ‘आयएसओ’चे मानांकन मिळवून देण्यासाठी अतिरिक्त कार्यकारी अभियंते दिवाकर देशमुख, भुजंग बाबर, विश्वास भोसले, नितीन गायकवाड, सहायक अभियंता सुजित ननावरे व अनिल हुलसूरकर, जनमित्र संतोष खताळ, मधुकर भालेराव, नितीन काळे, संतोष हेगडे, अनिल फाळके, प्रवीण माळवदे, राजेश शेळके, अभिषेक गोरे आदींनी योगदान दिले.

सर्व वर्गवारीतील ग्राहकांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठ्याची सेवा देण्यासाठी महावितरणचे उपकेंद्र व स्विचिंग स्टेशन्स अतिशय महत्त्वाचे आहेत. या उपकेंद्रांच्या आधुनिकीकरणासोबतच त्याची योग्य निगा, दर्जा व व गुणवत्ता अबाधित ठेवण्याचे निर्देश मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी दिले आहेत. त्याप्रमाणे पिंपरी विभाग अंतर्गत चिंचवड उपविभागातील २२/२२ गणेशम् स्विचिंग स्टेशन तसेच खराळवाडी उपविभागातील म्हाडा २२/११ केव्ही उपकेंद्रांनी ‘आयएसओ ९००१:२०१५’चे मानांकनासाठी तयारी सुरू केली होती.

#### तब्बल 27 अटी व शर्तींच्या मानकांप्रमाणे तपासणी

आवश्यक निकषांनुसार या दोन्ही उपकेंद्रांची गुणवत्ता, कामकाजाचा दर्जा, सर्व प्रकारची सुरक्षा उपाययोजना व उपकरणांची उपलब्धता, पर्यावरण दस्ताऐवजीकरण, वैद्यकीय सुविधा, सुशोभीकरण आदी कामे करण्यात आली. ‘आयएसओ’च्या पथकांनी या दोन्ही उपकेंद्रांना नुकतीच भेट दिली व तब्बल २७ अटी व शर्तींच्या मानकांप्रमाणे तपासणी केली. यात हे उपकेंद्र ‘आयएसओ’च्या मानांकनासाठी पात्र ठरले.

---

# नागरिकांचा अभिप्राय शहराला बनविणार अव्वल!

### ‘स्वच्छ सर्वेक्षण 2024’ ; अभिप्राय नोंदवण्यासाठी आयुक्तांकडून नागरिकांना आवाहन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४’ स्पर्धेत पिंपरी चिंचवड शहराला अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी स्वच्छतेच्या बाबतीत नागरिकांचा अभिप्राय अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी स्वच्छ सर्व्हेक्षणात अभिप्राय नोंदवावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.**







‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४’ ही स्पर्धा देशभरातून घेतली जात आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका या स्पर्धेत सामील झाली आहे. या स्पर्धेसाठी नागरिकांचे अभिप्राय महत्वाचे असून त्यास अतिरिक्त गुण देण्यात आले आहेत. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस देशात अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक नागरिकाने आपला स्वच्छतेविषयक अभिप्राय देणे महत्त्वाचे आहे. दरम्यान, ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४’ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने जोरदार तयारी केली आहे. आरोग्य विभागाकडून घराघरातील कचरा संकलित करून त्यावर पुढील योग्य ती प्रक्रिया केली जात आहे. नागरिकांमध्ये ओला, सुका कचरा विलगीकरण, होम कम्पोस्टिंग, कापडी पिशव्यांचा वापर या विषयी जनजागृती करण्यासाठी आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनासाठी आरोग्य विभागाकडून विविध उपक्रम देखील राबवण्यात येत आहेत.

असा नोंदवता येईल अभिप्राय
#सर्वात प्रथम नागरिकांनी https://sbmurban.org/feedback या संकेतस्थळावर जा.
#त्यानंतर स्वतःचा मोबाईल क्रमांक टाका आणि पसंतीची भाषा निवडा.
#‘राज्य’ या पर्यायात ‘महाराष्ट्र’ आणि ‘जिल्हा’ या पर्यायात ‘पुणे’ निवडा
#युएलबी पर्यायात ‘पिंपरी चिंचवड’ निवडा
#त्यानंतर तुमच्या समोर येणाऱ्या प्रश्नांचे योग्य उत्तर द्या
#तुमच्या मोबाईलवर येणारा ओटीपी टाकून अर्ज सबमिट करा.

> ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४’ या स्पर्धेत आपल्या पिंपरी चिंचवड शहराला देशात अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी नागरिकांनी अधिकाधिक प्रमाणात स्वच्छतेविषयक अभिप्राय नोंदवण्याची गरज आहे. हा अभिप्राय ऑनलाइन नोंदवता येत असून ही प्रक्रियाही सोपी आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी अभिप्राय नोंदवावा.
>
> –विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त

> पिंपरी चिंचवड शहराला ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४’ मध्ये अव्वल क्रमांक मिळावा,, यासाठी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत विविध उपक्रम राबवले जात आहेत. या स्पर्धेत ‘नागरिकांचा अभिप्राय’ यासाठी देखील गुण राखीव ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी आपला अभिप्राय नोंदवावा.
>
> –शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### परमात्म्यावर पूर्ण निष्ठा पाहिजे.

आईकरिता रडत असलेले मूल आई भेटल्याशिवाय रडणे थांबवत नाही, त्याप्रमाणे, समाधानाकरिता, आनंदाकरिता, धडपडणारा आपला जीव, परमेश्वर प्राप्त झाल्याशिवाय शांत राहू शकत नाही. म्हणून प्रपंचाची काळजी न करता, परमेश्वराची प्राप्ती कशी होईल याची काळजी करा. भगवंतावर संपूर्णपणे निष्ठा ठेवल्याशिवाय आपली प्रपंचाची काळजी दूर होणार नाही. सर्व जगताचा जो पालनकर्ता, तो आपले पालन नाही का करणार ? प्रत्येक गोष्ट त्याच्याच सत्तेने होते हे लक्षात ठेवा, मग प्रपंच कधीही बाधक होणार नाही. एक भगवंतावरची निष्ठा मात्र शेवटच्या श्वासापर्यंत सांभाळा. आपण पुराणात वाचलेच आहे की, भीष्माने पांडवांना मारण्याची प्रतिज्ञा केली. भीष्मप्रतिज्ञाच ती, मग ती खोटी कशी होऊ शकेल? सर्व पांडव चिंताग्रस्त झाले, पण द्रौपदीची निष्ठा मात्र जबरदस्त होती. ती म्हणाली, "आपण श्रीकृष्णाला विचारू." तिने सर्व वृत्तांत त्याला कथन केला. श्रीकृष्ण म्हणाला, "भीष्माची प्रतिज्ञा खोटी कशी होईल ? तरी आपण एक प्रयत्न करून बघू." तो म्हणाला, "द्रौपदी, तू आता असे कर, रात्री भीष्माचार्यांच्या आश्रमात जा. तिथे फक्त संन्याशांना आणि स्त्रियांना मुभा आहे. मी तुझ्याबरोबर आश्रमापर्यंत येतो." त्यानंतर श्रीकृष्ण द्रौपदीला घेऊन भीष्माचार्यांच्या आश्रमापर्यंत गेले आणि बाहेरच तिचे अलंकार आणि इतर वस्तू सांभाळत बसले. श्रीकृष्णांनी तिला आत जाताना सांगितले की, "भीष्माचार्य आता झोपत आहेत, अशा वेळी तू आत जा आणि बांगड्या वाजवून नमस्कार कर." त्याप्रमाणे द्रौपदी आत गेली, आणि बांगड्या वाजवून भीष्माचार्यांना तिने नमस्कार केला. त्यांनी लगेच तिला "अखंड सौभाग्यवती भव" म्हणून आशीर्वाद दिला. मग त्यांनी पाहिले तो द्रौपदी ! तेव्हा ते म्हणाले, "द्रौपदी ही अक्कल तुझी खचित नव्हे; तुझ्याबरोबर कोण आहे ते सांग." ती म्हणाली, "माझ्याबरोबर गडी आणला आहे; तो बाहेर उभा आहे." भीष्माचार्यांनी बाहेर येऊन पाहिले. त्यांनी श्रीकृष्णाला ओळखले, परंतु आता सर्व काम होऊन चुकले होते. म्हणून म्हणतो, परमात्म्यावर पूर्ण निष्ठा पाहिजे. या निष्ठेच्या आड जर काही येत असेल तर तो म्हणजे आपला अभिमान. हा अभिमान सर्वांना घातक आहे. तो घालवण्यासाठीच परमात्म्याला वारंवार अवतार घेणे भाग पडले. ही अभिमानाची हरळी नाहीशी व्हायला भगवंताच्या नामासारखा दुसरा उपाय नाही. नामावर प्रह्लादाने जशी निष्ठा ठेवली तशी ठेवावी. च जन्मात हे नाम शांतीचा आणि समाधानाचा ठेवा मिळवून देईल.

**बोधवचनः- नामस्मरणात स्त्रीपुरूष, श्रीमंतगरीब, हे भेद नाहीत. फक्त ते श्रद्धेने घेणे जरूर आहे.**



**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**

संस्थापक, संपादक

**प्रार्थना स्थळांवरील भोंग्यांबाबत देवेंद्र फडणवीस यांचे सरकार एकदम 'अलर्ट मोड' वर आलं आहे. त्याचा उपद्रव नाही, असं जरी म्हटलं जात असलं तरी अनेक सामाजिक प्रश्न या निमित्तानं उद्भवू शकतात.. त्यामुळं जातीय सलोखा बिघडून तणावही वाढू शकतो.**

# डोकं फिरवतो नमाज, त्यात भोंग्याचा आवाज!



### पुणे शहरात १८३० भोंगे!

तुम्हाला आश्चर्य वाटेल, एकट्या पुणे शहरातील सर्वधर्मीय प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांचं पोलिसांकडून सर्वेक्षण होणार असून सद्य:स्थितीला विविध प्रार्थनास्थळांवर एक हजार ८३० भोंगे असल्याची नोंद आहे. त्यांचे कर्ण कर्कश्य आवाज ऐकून सर्व सामान्य नागरिकाचे काय होत असेल देव (सॉरी, अल्ला) जाणे ! फडणवीस सरकारनं नुकताच निर्णय जाहीर केला आहे. महाराष्ट्रातल्या प्रार्थनास्थळांवरच्या भोंग्यावर जर कुणी ५५ डेसिबल आणि ४५ डेसिबलचे उल्लंघन केलं तर त्याला पुन्हा कधीच परवानगी दिली जाणार नाही. त्या भोंग्यांची यादी जारी केली जाईल, याचं तंतोतंत पालन होत आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी ही पोलिस निरीक्षकांची असेल, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत, हे सर्वांनी लक्षात घ्यायला हवे !

### सरकारची करडी नजर.

सरकारची या भोंग्यांवर करडी नजर असणार आहे. जो कुणी ५५ डेसिबलच्या नियमांचं उल्लंघन करणार, त्याची परवानगी कायमसाठी रद्द करण्यात येईल, असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांच्या आवाजाची तीव्रता तपासण्याचं काम, हे पोलिस निरीक्षकाचं असून त्याची माहिती त्यांनी प्रदूषण नियंत्रण बोर्डला देणं गरजेचं आहे, असं फडणवीस म्हणाले.राज्यातील प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांच्या आवाजाबाबत अनेक तक्रारी आल्या आहेत. त्यावर विधानसभेत प्रश्न विचारण्यात आला. उत्तर देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कायद्यानुसार, अधिक डेसिबलने हे भोगे वाजत असतील तर प्रदूषण नियमक मंडळ कारवाई करतं. कुणालाही सरसकट भोग्यांची परवानगी देणार नाही, निश्चित कालावधीसाठी परवानगी दिली जाईल. त्यानंतर जर पुन्हा कुणाला परवानगी हवी असेल, तर ती पोलिसांकडून नव्याने घ्यावी लागेल.

### तर, परवानगी कायमची रद्द

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, डेसिबलचे उल्लंघन केले तर त्याला पुन्हा कधीच परवानगी दिली जाणार नाही. त्या भोग्यांची यादी केली जाईल, याचे तंतोतंत पालन होत आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी ही पोलिस खात्याची असेल, असं त्यांनी आदेशात स्पष्ट म्हटलं आहे.

### पोलीस निरीक्षक तपासणी करणार

पोलिस निरीक्षकानं प्रत्येक प्रार्थनास्थळाला भेट देऊन तपासणी करावी. त्यासाठी प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये मीटर दिलं आहे. त्यानंतर जर कुठं उल्लंघन केलं जात असेल, तर त्याची माहितीप्रदूषण नियंत्रण बोर्डला दिली पाहिजे. दुसऱ्या टप्प्यामध्ये अशा भोग्यांना पुन्हा परवानगी दिली जाणार नाही, असा आदेश सरकारनं दिला आहे.

### कारवाईचे अधिकार कुणाकडे?

केंद्रीय कायद्यानुसार प्रदूषण बोर्डने ही कारवाई करण्याची जबाबदारी आहे. या संबंधी नियमांमध्ये काही बदल करण्यासाठी केंद्रालाही विनंती करण्यात येईल, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.जो काही नियम आहे, त्याचं पालन होतं, की नाही हे पाहण्याची जबाबदारी ही त्या ठिकाणच्या पोलिस निरीक्षकाची आहे. त्यानं जर काम केलं नाही, तर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल असं सांगण्यात आलं आहे

### कारवाईची अनेकदा मागणी

मशिदीवरील भोंग्यावर कारवाई करावी अशी याआधी अनेकदा मागणी केली आहे. त्यावर मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही आवाज उठवला होता. त्यानंतर काही प्रमाणात भोग्यांवर कारवाई केली होती. पण, नंतर पुन्हा एकदा ही कारवाई थंडावल्याचं दिसतं. याबाबत सगळी कारवाई केंद्रानं ठरवल्यानुसार एम पी सी बी ला करायची आहे. त्यामुळ सध्या जे नियम आहेत, त्यात बदल करणं गरजेचं आहे. जर हे नियम बदलले तर अधिक प्रभावीपणे यावर कारवाई करता येईल. यावर केंद्र सरकारला विनंती करण्यात येईल. आम्ही जे बदल यात सुचवत आहेत, ते केंद्रानं करून द्यावेत. जेणेकरून त्या बदलांच्या अनुरूप भोंग्याबाबत अत्यंत कडक कारवाई करता येईल. यापुढं भोंग्याबाबत समस्येची जबाबदारी पोलीस निरीक्षकाची असेल, त्यांनी नाही केलं तर त्याच्यावर कारवाई केली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केलं.

### देवयानी ताईंनी काय म्हटलं?

राज्यात प्रार्थनास्थळांवर असणाऱ्या भोग्यांबाबत आ. देवयानी फरांदे यांनी लक्षवेधी मांडली होती. अजाण म्हणणं योग्य आहे. परंतु भोंगा कुठल्याही धार्मिक भावनेशी संबंधित नाही. मशिदीच्या परिसरात राहणाऱ्या लोकांना कुणी आजारी असतं, वयोवृद्ध असतं , कुणी रात्रपाळी करून आलेले असतात, या सर्वांना भोंग्यातून होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाचा त्रास होतो. १७ एप्रिल २०२२ रोजी नाशिक शहरात तत्कालीन पोलीस आयुक्त यांनी सरकारला पत्र पाठवलं होतं. भोंगे बंद करण्याबाबत ते पत्र होते, परंतु तेव्हाच्या उद्धव ठाकरे सरकारनं कुठलाही निर्णय घेतला नाही. त्यानंतर उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांनी १९ एप्रिल २०२२ रोजी उत्तर प्रदेशात भोंगे पूर्णपणे बंद केले. एखाद्या सणावेळी ठीक, परंतु रोज दिवसातून ६-६ वेळा भोंग्यावरून अजाण म्हटली जाते. या विषयात सरकार उत्तर प्रदेशच्या धर्तीवर हे भोंगे बंद करणार का, हायकोर्टाने यावर मार्गदर्शक सूचना दिली आहे, त्यापलीकडं जाऊन हे विधिमंडळ कायदा करून भोंगे बंद करणार का, ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत भोंगे वाजत असतील तिथल्या पोलीस निरीक्षकांवर तात्काळ कारवाई करणार का? असा सवाल फरांदे यांनी विचारला होता.

हिंदू -मुस्लिम सलोखा टिकवण्याच्या दृष्टीने भोंग्याचा प्रश्न अत्यंत नाजूक आहे. या मुद्द्यावर हिंदूंच्या भावनाही तीव्र आहेत. फडणवीस सरकारनं पुढाकार तर घेतला आहे, पण त्याची फळं कशी मिळणार, हा चिंतेचा विषय आहे, हे नक्की!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बीड राजकारणी सापांचं बीळ!

## व्हायरल होत असलेल्या व्हिडिओंवर काँग्रेस नेत्याचं वक्तव्य

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**गेल्या तीन-चार महिन्यांपासून बीडमध्ये घडलेल्या गुन्हेगारी घटनांमुळे संपूर्ण जिल्हा चर्चेत आला आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे संपूर्ण राज्य हादरले होते. त्यानंतर या प्रकरणातील एक आरोपी वगळता इतर सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे. याचबरोबर धनंजय मुंडे यांना त्यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराडही या प्रकरणात असल्याचे आरोप झाल्यानंतर मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. त्यानंतर आता सुरेश धस यांचा कार्यकर्ता सतीश उर्फ खोक्या भोसले यालाही एका मारहाणीच्या प्रकरणात अटक करण्यात आले आहे.**



बीडमधील गुन्हेगारी घटनांचे व्हिडिओ सतत व्हायरल होत असल्याने काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी, बीड हे राजकारणी सापांचं बीळ झालं असल्याची टीका केली आहे. आज पत्रकारांशी बोलताना त्यांना बीडमधील गुन्हेगारीवर प्रश्न विचारण्यत आला होता. त्यावेळी त्यांनी हे विधान केले. विजय वडेट्टीवार यांना बीडमधील गुन्हेगारी घटनांबाबत विचारण्यात आले तेव्हा ते म्हणाले, "बीड आता राजकारणी सापांचं बीळ झालं आहे. तिथं जो घुसतो तो साप बनून येतो, नाग बनून येतो, अजगर बनून येतो. कोणी विंचूही बनून येईल आणि एकमेकांना चावत राहतील. ही बीडची सध्याची राजकीय परिस्थिती आहे."यावेळी वडेट्टीवारांना सध्या राज्यात मटन सर्टिफिकेशनच्या वादाबाबत विचारले असता, ते म्हणाले,"काय ते? सोडा ना, नितेश राणे मंत्री झाले आहेत ठीक आहे. त्यामुळे यावर काही भाष्य करण्याची गरज नाही. आम्ही त्याकडे लक्षही देत नाही. नितेश राणेंच्या या सगळ्या बोलण्यातून राम भरोसे हिंदू हॉटेल जोरदार चालवावं हे एकच दिसत आहे."भाजपा आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता आणि बीडमधील कुख्यात गुंड सतीश उर्फ खोक्या भोसले याला बुधवारी (१२ मार्च) बीड पोलिसांनी उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथून अटक केली. एका इसमाला अर्धनग्न करून बेदम मारहाण केल्याप्रकरणी खोक्यावर गुन्हा दाखल झाला होता.

या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यापासून तो फरार होता. गेल्या सहा दिवसांपासून पोलीस त्याचा शोध घेत होते. अखेर पोलिसांनी त्याचं लोकेशन ट्रॅक केलं आणि थेट प्रयागराज गाठलं. तिथेच त्याच्या मुसक्या आवळल्या.बीडमधील गुन्हेगारी घटनांचे व्हिडिओ सतत व्हायरल होत असल्याने काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी, बीड हे राजकारणी सापांचं बीळ झालं असल्याची टीका केली आहे. आज पत्रकारांशी बोलताना त्यांना बीडमधील गुन्हेगारीवर प्रश्न विचारण्यत आला होता. त्यावेळी त्यांनी हे विधान केले. विजय वडेट्टीवार यांना बीडमधील गुन्हेगारी घटनांबाबत विचारण्यात आले तेव्हा ते म्हणाले, "बीड आता राजकारणी सापांचं बीळ झालं आहे. तिथं जो घुसतो तो साप बनून येतो, नाग बनून येतो, अजगर बनून येतो. कोणी विंचूही बनून येईल आणि एकमेकांना चावत राहतील. ही बीडची सध्याची राजकीय परिस्थिती आहे."यावेळी वडेट्टीवारांना सध्या राज्यात मटन सर्टिफिकेशनच्या वादाबाबत विचारले असता, ते म्हणाले.

### खोक्या भोसलेला अटक

काही भाष्य करण्याची गरज नाही. आम्ही त्याकडे लक्षही देत नाही. नितेश राणेंच्या या सगळ्या बोलण्यातून राम भरोसे हिंदू हॉटेल जोरदार चालवावं हे एकच दिसत आहे."भाजपा आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता आणि बीडमधील कुख्यात गुंड सतीश उर्फ खोक्या भोसले याला बुधवारी (१२ मार्च) बीड पोलिसांनी उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथून अटक केली. एका इसमाला अर्धनग्न करून बेदम मारहाण केल्याप्रकरणी खोक्यावर गुन्हा दाखल झाला होता. या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यापासून तो फरार होता. गेल्या सहा दिवसांपासून पोलीस त्याचा शोध घेत होते.

# अहिल्यानगर: जि.प.चे ५२.५४ कोटींचे अंदाजपत्रक

## ड्रोन फवारणी यंत्र, शेतकऱ्यांना स्लरी फिल्टर, आरोग्य केंद्रांना सौर ऊर्जा

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**जिल्हा परिषदेचे आगामी सन २०२५-२६ साठी ५२ कोटी ५४ लाख ९० हजार ४२६ रुपयांच्या मूळ अंदाजपत्रकाला प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी आज, गुरुवारी मान्यता दिली. यंदाच्या अंदाजपत्रकात काही मागील योजना कायम ठेवतानाच यंदा संस्थांना ड्रोन फवारणी यंत्र देणे शेतकऱ्यांना स्लरी फिल्टर उपकरण अनुदानावर देणे, प्राथमिक आरोग्य व उपकेंद्रांवर सौर ऊर्जा प्रणाली प्रस्थापित करणे अशा काही नवीन योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.**



आज झालेल्या प्रशासकीय सभेत सीईओ येरेकर यांनी या अंदाजपत्रकाला मान्यता दिली. मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे यांनी हे अंदाजपत्रक सादर केले. विविध विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते. निधी उपलब्धतेबाबत नवीन आभासी 'व्हीपीडी' प्रणाली सुरू झाल्यानंतर व्याजाच्या उत्पन्नात सुमारे ५.३० कोटी रुपयांची घट झाली आहे. मात्र, यंदा मुद्रांक शुल्क ७ कोटी रुपयांनी अधिक मिळाले आहे. याबरोबरच निविदा अर्ज व ठेकेदार नोंदणी शुल्कात वाढ केल्यामुळे उत्पन्न सुमारे ३० लाखांनी वाढले आहे.प्राथमिक शाळांमध्ये 'ओपन सायन्स पार्क' विकसित करणे, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांची इस्रो व डीआरडीओ या प्रशिक्षण व संशोधन संस्थांना शैक्षणिक सहल आयोजित करणे, प्राथमिक शाळांसाठी पथदर्शी ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी 'मिशन आरंभ' दुभत्या जनावरांच्या पोटातील लोहजन्य वस्तू प्रतिबंध व उपायाकरता 'काऊ मॅग्नेट' पुरवणे अशा योजना आगामी वर्षासाठी कायम ठेवण्यात आल्या आहेत. प्राथमिक शिक्षणासाठी २.९१ कोटी, बांधकामसाठी ८.४४ कोटी, लघु पाट बंधाऱ्यांसाठी १.३० कोटी, ग्रामीण पाणीपुरवठा २.९० कोटी, आरोग्य ८५ लाख, कृषी १.०७ कोटी, पशुसंवर्धन १.२९ कोटी, समाजकल्याण ३.७६ कोटी, दिव्यांग कल्याण ७२.५० लाख, महिला व बालकल्याण १४.५० लाख, ग्रामपंचायती विभाग १२.२५ कोटी अशा तरतुदी करण्यात आल्या आहेत.वैयक्तिक लाभाच्या विविध योजनांद्वारे जिल्ह्यातील सुमारे ५ हजार जणांना मदत करण्याचे उद्दीष्ट ठेवल्याची माहिती सीईओ येरेकर यांनी दिली. यामध्ये शेतकऱ्यांना कडबाकुट्टी, ५ वी ते १० वीच्या मुली व मुलांना मोफत सायकल, शेतकऱ्यांना स्प्रे पंप, मागासवर्गीय शेतकऱ्यांसाठी स्प्रिंकलर, पिठाची गिरणी, दिव्यांगसाठी झेरॉक्स मशीन, महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण, दिव्यांग महिला व बालकांना साहित्य, पशुपालकांना दूध काढणी यंत्र, मुक्त संचार गोठा आदी योजनांचा समावेश आहे.

### प्राथमिक शिक्षणासाठी 2.91 कोटी

मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे यांनी हे अंदाजपत्रक सादर केले. विविध विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते. निधी उपलब्धतेबाबत नवीन आभासी 'व्हीपीडी' प्रणाली सुरू झाल्यानंतर व्याजाच्या उत्पन्नात सुमारे ५.३० कोटी रुपयांची घट झाली आहे. मात्र, यंदा मुद्रांक शुल्क ७ कोटी रुपयांनी अधिक मिळाले आहे.

# सिसोदिया-सत्येंद्र जैन यांना मोठा धक्का!

## घोटाळ्याप्रकरणी FIR दाखल करण्यास गृह मंत्रालयाची मंजुरी

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दिल्ली विधानसभा निवडणुकीत अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्षाला मोठा झटका बसल्याचे पाहायला मिळाले. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने आपला पराभूत करत ऐतिहासिक विजय नोंदवला. यानंतर आम आदमी पक्षाच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. कारण १३०० कोटी रुपयांच्या कथित घोटाळ्याप्रकरणी गृह मंत्रालयाने आपचे नेते मनीष सिसोदिया आणि सत्येंद्र जैन यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्यास मान्यता दिली आहे.**





दिल्लीतील सरकारी शाळांमध्ये वर्गखोल्या बांधताना हा घोटाळा झाल्याचा आरोप आहे. इंडियन एक्सप्रेसने सूत्रांच्या हवाल्याने यासंबंधीचे वृत्त दिले आहे.२०२२ मध्ये दिल्ली सरकारच्या दक्षता आयोगाने कथित घोटाळ्याची चौकशी करण्याची शिफारस केली होती आणि मुख्य सचिवांना अहवाल सादर केला होता.अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात मंत्रिपदावर असताना मनीष सिसोदीया आणि सत्येंद्र जैन यांनी केलेल्या कथित घोटाळ्याप्रकरणी एफआयआर दाखल करण्यासाठी राष्ट्रपतींनी देखील मान्यता दिली आहे, सूत्रांनी यासंबंधीची माहिती दिली आहे. केंद्रीय दक्षता आयोगाने (सीव्हीसी) त्यांच्या १७ फेब्रुवारी २०२० च्या रिपोर्टमध्ये, सार्वजनिक बांधकाम विभागाने (PWD) दिल्ली सरकारी शाळांमध्ये २४०० हून अधिक वर्गखोल्यांच्या बांधकामात स्पष्टपणे अनियमितता आढळून आल्याचे नमूद केले आहे. मनीष सिसोदीया हे दिल्लीचे उपमुख्यमंत्री राहिले आहेत. आबकारी धोरण प्रकरणात ते तुरूंगात देखील गेले होते . तर सत्येंद्र जैन यांची मनी लॉंड्रिंग प्रकरणात चौकशी केली जात आहे. आता गृह मंत्रालयाने मंजुरी दिल्यानंतर या दोन आम आदमी पक्षाच्या नेत्यांच्या अडचणी आणखी वाढण्याची चिन्हे आहेत. हे दोनही नेते सध्या जामीनावर तुरूंगाबाहेर आहेत.दिल्लीतील माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदीया यांना सीबीआयने मद्य घोटाळ्याच्या आरोपांनंतर अटक केले होते. त्यांच्यावर आरोप आहे की मद्य धोरण २०२१-२२ लागू करताना भ्रष्टाचार करण्यात आला. सीबीआय आणि ईडीचा आरोप आहे की सिसोदीया यांनी मद्य धोरण काही खाजगी कंपन्यांना फायदा मिळवून देण्यासाठी आखण्यात आले होते. तसेच या प्रकरणात १०० कोटींची लाच घेतल्याचा आरोप असून ही रक्कम गोवा निवडणुकी दरम्यान आम आदमी पक्षाच्या प्रचारासाठी वापरण्यात आली. तर सत्येंद्र जैन हे माजी आरोग्य मंत्री आहेत. त्यांना ईडीने ३० मे २०२२ साली मनी लॉंड्रिंगच्या प्रकरणात अटक केली होती. ईडीचा आरोप आहे की जैन यांनी २०१५-२०१६ साली बनावट कंपन्यांच्या मध्यमातून १६.३९ कोटी रुपयांची मनी लॉंड्रिंग केली होती.दिल्लीतील सरकारी शाळांमध्ये वर्गखोल्या बांधताना हा घोटाळा झाल्याचा आरोप आहे. इंडियन एक्सप्रेसने सूत्रांच्या हवाल्याने यासंबंधीचे वृत्त दिले आहे.२०२२ मध्ये दिल्ली सरकारच्या दक्षता आयोगाने कथित घोटाळ्याची चौकशी करण्याची शिफारस केली होती आणि मुख्य सचिवांना अहवाल सादर केला होता.अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात मंत्रिपदावर असताना मनीष सिसोदीया आणि सत्येंद्र जैन यांनी केलेल्या कथित घोटाळ्याप्रकरणी एफआयआर दाखल करण्यासाठी राष्ट्रपतींनी देखील मान्यता दिली आहे, सूत्रांनी यासंबंधीची माहिती दिली आहे. केंद्रीय दक्षता आयोगाने (सीव्हीसी) त्यांच्या १७ फेब्रुवारी २०२० च्या रिपोर्टमध्ये, सार्वजनिक बांधकाम विभागाने (PWD) दिल्ली सरकारी शाळांमध्ये २४०० हून अधिक वर्गखोल्यांच्या बांधकामात स्पष्टपणे अनियमितता आढळून आल्याचे नमूद केले आहे. मनीष सिसोदीया हे दिल्लीचे उपमुख्यमंत्री राहिले आहेत.तर सत्येंद्र जैन यांची मनी लॉंड्रिंग प्रकरणात चौकशी केली जात आहे.दिल्लीतील माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदीया यांना सीबीआयने मद्य घोटाळ्याच्या आरोपांनंतर अटक केले होते. त्यांच्यावर आरोप आहे की मद्य धोरण २०२१-२२ लागू करताना भ्रष्टाचार करण्यात आला. सीबीआय आणि ईडीचा आरोप आहे की सिसोदीया यांनी मद्य धोरण काही खाजगी कंपन्यांना फायदा मिळवून देण्यासाठी आखण्यात आले होते.

### मनी लॉंड्रिंग प्रकरणात चौकशी

गोवा निवडणुकी दरम्यान आम आदमी पक्षाच्या प्रचारासाठी वापरण्यात आली. तर सत्येंद्र जैन हे माजी आरोग्य मंत्री आहेत. त्यांना ईडीने ३० मे २०२२ साली मनी लॉंड्रिंगच्या प्रकरणात अटक केली होती. ईडीचा आरोप आहे की जैन यांनी २०१५-२०१६ साली बनावट कंपन्यांच्या मध्यमातून १६.३९ कोटी रुपयांची मनी लॉंड्रिंग केली होती.

# रशियाची खूप वाईट अवस्था करू शकतो

## चर्चेआधीच डोनाल्ड ट्रम्प यांचा पुतिन यांना इशारा

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांना थेट इशारा दिला आहे. युक्रेनबरोबर सुरू असलेल्या युद्धादरम्यान रशियाने जर युद्धविरामाचा प्रस्ताव नाकारला तर त्यांच्यावर टोकाचे निर्बंध लादले जातील असे म्हटले आहे.**



आयर्लंडचे पंतप्रधान मायकल मार्टिन यांच्याशी व्हाईट हाऊस येथे भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना ट्रम्प म्हणाले की, युक्रेनने ३० दिवसांच्या युद्धविरामाच्या कराराला संमती दर्शवल्यानंतर दुसऱ्याच दिवशी संभाव्य युद्धविरामाच्या चर्चेसाठी अमेरिकेचे अधिकारी रशिया येथे जात आहेत. मात्र ट्रम्प यांनी याबद्दल सविस्तर माहिती दिली नाही. त्यांचे विशेष राजदूत स्टीव्ह विटकॉफ हे देखील या आठवड्याच्या अखेरीस मॉस्कोला जाणार असल्याचे व्हाईट हाऊसकडून सांगण्यात आले.ट्रम्प म्हणाले की, “आम्ही रशियाशी खूप वाईट अवस्था करू शकतो. हे रशियासाठी हे खूप विनाशकारी असेल. पण मला ते करायचे नाही कारण मला शांतता हवी आहे आणि कदाचित आम्ही काहीतरी साध्य करण्याच्या जवळ पोहोचलो आहोत”. तीन वर्षांपासून सुरू असलेल्या रशिया युक्रेन-युद्धाबद्दल बोलताना ट्रम्प म्हणाले की, “सध्या आपण बोलत असताना लोक रशिया येथे जात आहेत आणि आशा आहे की, आपण रशियाकडून युद्धविराम मान्य करून घेऊ आणि जर आपण ते करू शकलो तर भीषण रक्तपात थांबवण्याकडे आपली ८० टक्के वाटचाल पूर्ण झालेली असेल.”युक्रेनचे अध्यक्ष झेलन्स्की यांच्याबरोबर झालेल्या त्यांच्या विस्फोटक चर्चेच्या दोन आठवड्यानंतर ट्रम्प यांनी रशियाला हा इशारा दिला आहे. झेलेन्स्की आणि ट्रम्प यांच्यात युद्धाच्या मुद्द्यावर व्हाईट हाऊस येथे ही चर्चा झाली होती. दोन नेत्यांमधील या चर्चेनंतर ट्रम्प यामंनी युक्रेनला दिली जाणारी लष्करी मदत आणि गुप्तचर माहिती थांबवली होती. मात्र मंगळवारी युक्रेनने युद्धविराम प्रस्तावाला सहमती दिल्यानंतर ही मदत पुन्हा सुरू करण्यात आली आहे.

### युक्रेन प्रस्तावाचे स्वागत करतो

अमेरिका आणि युक्रेनच्या अधिकाऱ्यांमध्ये सौदी अरेबिया येथे मंगळवारी चर्चा झाल्यानंतर झेलेन्स्की यांनी युद्धविरामाच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला होता. यावेळी त्यांनी अमेरिकेने रशियाला हा प्रस्ताव मान्य करायला लावला पाहिजे असेही ते म्हणाले होते. “युक्रेन या प्रस्तावाचे स्वागत करतो, आम्ही याला सकारात्मक समजतो.

# सचिन खेडेकर पुन्हा रंगभूमीवर परतणार



मराठी नाटकांचा मोठा चाहतावर्ग आहे. एखादा कलाकार कितीही मोठा झाला, कितीही राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळवले, मसालापट ते चरित्रपटांपर्यंत आभाळाएवढ्या उंचीच्या व्यक्तिरेखा साकारल्या तरी रंगभूमीची ओढ कधीच संपत नाही. कोणताही हाडाचा कलाकार ठराविक वेळेनंतर पुन्हा तो रंगभूमीकडे वळतो, इथे होणाऱ्या तिसऱ्या घंटेसोबत व्यक्तिरेखेत शिरतो, प्रयोगामागून प्रयोग करत त्यातच रमतो आणि जिवंत कला पाहण्याचा अनुभव रसिकांना देण्यासाठी मेहनत करतो. चतुरस्र अभिनेते सचिन खेडेकरही याला अपवाद नाहीत. मराठीपासून हिंदी आणि दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाचा अमीट ठसा उमटवणारे सचिन खेडेकर तब्बल २१ वर्षांनी पुन्हा मराठी व्यावसायिक रंगभूमीकडे वळले आहेत. 'गेट वेल SOON!', 'हॅम्लेट', 'हसवा फसवी', 'वाडा चिरेबंदी', 'मग्न तळ्याकाठी', 'युगान्त', 'संज्या छाया', 'हरवलेल्या पत्त्यांचा बंगला', 'चारचौघी', 'आज्जी बाई जोरात' या मराठी व्यावसायिक रंगभूमी गाजवणाऱ्या दर्जेदार नाटकांची परंपरा जपणाऱ्या जिगिषा आणि अष्टविनायक या निर्मिती संस्थांनी पुन्हा एकदा नवीन नाट्यकृतीचे शिवधनुष्य उचलले आहेअसे म्हणत जिगिषा अष्टविनायक एक नवीन नाटक घेऊन येत आहेत. चंद्रकांत कुलकर्णी सादरकर्ते असलेल्या 'भूमिका' या नाटकाद्वारे सचिन खेडेकर रंगभूमीवर पुनरागमन करणार आहेत.अभिनेते सचिन खेडेकर यांनी आजवर दमदार अभिनयकौशल्याच्या जोरावर मराठीत चित्रपट, मालिका, नाटक या तीनही माध्यमांत आपला ठसा उमटवला असून, सोबत हिंदी, तेलुगू, गुजराती, तमिळ, मल्याळम चित्रपट तसेच वेब सीरिजमध्येही त्यांच्या अनेक भूमिका लक्षवेधी ठरल्या आहेत.

# काव्या अन् जीवाचं अफेअर आईसमोर येणार!




लग्नानंतर होईलच प्रेम' ही मालिका सध्या चांगलीच चर्चेत आहे. या मालिकेत काही दिवसांपूर्वीत एक मोठा ट्विस्ट पाहायला मिळाला होता. पार्थ-नंदिनीचं एकमेकांशी अरेंज मॅरेज ठरलेलं असतं. मात्र, खलनायिकांच्या कारस्थानामुळे ऐन लग्नाच्या दिवशी नंदिनीला किडनॅप केलं जातं. यामुळे गावातले लोक बळजबरीने नंदिनीच्या धाकट्या बहिणीचं म्हणजेच काव्याचं आणि पार्थचं लग्न लावून देतात. काव्या-पार्थचा लग्नसोहळा पार पडत असताना जीवा-नंदिनी लग्नमंडपात पोहोचतात. नंदिनी घडलेला संपूर्ण प्रकार सांगते आणि त्यानंतर तिच्यावर सुद्धा लग्न करण्यासाठी दबाव टाकला जातो. यानंतर भर मांडवात जीवा तिचा स्वीकार करतो आणि अखेरिस जीवा-नंदिनी विवाहबंधनात अडकतात. जीवा आणि काव्या आधीपासूनचं एकमेकांना डेट करत असतात. त्यामुळे जीवाला आपल्या मोठ्या बहिणीचा नवरा म्हणून पाहणं काव्याला सहन होत नसतं. एकीकडे काव्या पार्थबरोबर मनाविरुद्ध झालेल्या लग्नाचा तिरस्कार करत असते. तर, दुसरीकडे नंदिनी आई-बाबांच्या सुखासाठी जीवाबरोबर झालेलं लग्न निभावण्याचा निर्णय घेते. काव्या माहेरी आलेली असताना सगळेजण तिची समजूत काढत असतात. कारण, तिच्या आणि जीवाच्या अफेअरबद्दल कोणालाच माहिती नसतं...अगदी नंदिनीला सुद्धा नाही.काव्याची आई तिला सासरी जाण्यासाठी विनंती करत असते. पण, काव्या काही केल्या ऐकून घेण्यास तयार नसते. सासरी जाण्यास ती स्पष्ट नकार देते. यानंतर तिची आई लेकीची समजूत काढून सासरी जा असं तिला सांगते आणि तिची बॅग भरायला घेते. एवढ्यात काव्याच्या कपाटातून एक लॉकेट जमिनीवर पडलं. या हृदयाच्या आकाराच्या लॉकेटमध्ये एका बाजूला नंदिनीचा फोटो असतो, तर दुसऱ्या बाजूला जीवाचा फोटो असतो. हे लॉकेट काव्याची आई पाहते.

# आमिरने दिली प्रेमाची कबुली!

अभिनेता आमिर खानने प्रेमाची कबुली दिली आहे. ६० वर्षांचा आमिर रिलेशनशिपमध्ये आहे आणि त्याने स्वतःच त्याच्या गर्लफ्रेंडची ओळख करून दिली आहे. कोण आहे त्याची गर्लफ्रेंड, ते जाणून घेऊयात. बॉलीवूड अभिनेता आमिर खान त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. आमिर खान तिसऱ्यांदा प्रेमात पडला आहे. त्याने स्वतःच याबाबत माहिती दिली आहे. आमिर दीड वर्षापासून तिला डेट करतोय. तिचं नाव गौरी असून ती आमिरची २५ वर्षांपासूनची मैत्रीण आहे.आमिर खान व गौरी एकमेकांना गेल्या दीड वर्षांपासून डेट करत आहेत. गौरी मूळची बेंगळुरूची आहे. ती सध्या आमिर खानच्या प्रॉडक्शन हाऊसमध्ये काम करत आहे. दोघेही अनेक ठिकाणी एकत्र दिसतात. गौरीला एक मुलगा असून तो सहा वर्षांचा आहे. गौरी ही तमिळ व आयरिश आहे. तिचे आजोबा स्वातंत्र्यसैनिक होते. गौरीने आमिरचे 'दंगल' व 'लगान' हेच चित्रपट पाहिले आहेत. आमिरने प्रेमाची कबुली देताना गौरीबरोबर आनंदी असल्याचं म्हटलं आहे.आमिर खानने मुंबईत त्याच्या ६० व्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनदरम्यान माध्यमांना ही माहिती दिली. आमिरने सांगितलं की तो गौरीला २५ वर्षांपासून ओळखतो आणि आता ते रिलेशनशिपमध्ये आहेत. आमिर खान त्याच्या या नव्या व तिसऱ्या नात्याबाबत खूप गंभीर असल्याची चर्चा आहे. आमिरने गौरीची ओळख सलमान खान, शाहरुख खान तसेच आपल्या कुटुंबाला करून दिली आहे, अशी माहितीही समोर आली आहे.६० वर्षांच्या आमिर खानचा दोन वेळा घटस्फोट झाला आहे. त्याने पहिलं लग्न रीना दत्ताशी केलं होतं. १९८६ साली आमिर व रीना यांनी पळून जाऊन लग्न केलं होतं. या जोडप्याला जुनैद खान व आयरा खान ही दोन अपत्ये आहेत.

# आमिरने सलमानशी करून दिली ओळख

अभिनेता आमिर खानने आज (१३ मार्च) माध्यमांबरोबर त्याचा ६० वा वाढदिवस साजरा केला. त्याने या सेलिब्रेशनमध्ये त्याच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल एक मोठा खुलासा केला आहे. आमिर खानने प्रेमाची कबुली दिली असून त्याच्या गर्लफ्रेंडची ओळख करून दिली आहे. दोन वेळा घटस्फोटित असलेला आमिर खान पुन्हा एकदा प्रेमात पडला आहे. तो त्याच्या प्रॉडक्शन हाऊसमध्ये काम करणाऱ्या एका महिलेला डेट करतोय. तिचं नाव गौरी आहे. आमिर व गौरी एकमेकांना २५ वर्षांपासून ओळखतात. गौरी व आमिर वर्षभरापासून एकमेकांना डेट करत आहेत. गौरीबरोबरच्या नात्यात आनंदी असल्याचं आमिर खानने म्हटलं आहे.



# अभिनेत्री लग्नाआधीच आहे दोन मुलांची आई!

दाक्षिणात्य सुपरस्टार अल्लू अर्जुनचा बहुचर्चित 'पुष्पा २: द रुल' चित्रपट ५ डिसेंबर २०२४ रोजी प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाने प्रदर्शनानंतर पहिल्याच दिवशी जागतिक स्तरावर २८० कोटी कमाई केली होती. सुकुमार दिग्दर्शित 'पुष्पा २: द रुल' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घातला. भारतात या चित्रपटाने १४०० कोटींहून अधिक कमाई केली आहे. अल्लू अर्जुन, रश्मिका मंदाना, फहाद फासिल, श्रीतेज, अनासुया भारद्वाज, जगदीप प्रताप, जगपति बाबू या तगड्या कलाकार मंडळींनी प्रेक्षकांनी मनं जिंकली. तसंच या चित्रपटातील आयटम साँगमधून भाव खाऊन गेली ती म्हणजे श्रीलीला. दाक्षिणात्य अभिनेत्री श्रीलीलाने 'पुष्पा २: द रुल' चित्रपटातील 'किसीक' गाण्यावर जबरदस्त डान्स केला आहे. तेव्हापासून श्रीलीला खूप चर्चेत आहे. 'पुष्पा २: द रुल' या चित्रपटानंतर श्रीलीला बॉलीवूडमध्ये पदार्पण करत आहे. 'आशिकी ३' चित्रपटात श्रीलीला कार्तिक आर्यनबरोबर पाहायला मिळत आहे. त्यामुळे सध्या श्रीलीलाचं नाव कार्तिक आर्यनबरोबर जोडलं जात आहे. दोघं एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. अशातच श्रीलीला लग्नाआधीच दोन मुलांची आई असल्याचं समोर आलं आहे.

# मुंबईची फायनलमध्ये धडक!

## गुजरातवर दणदणीत विजय; हरमनप्रीतची ऐतिहासिक खेळी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबई इंडियन्सच्या संघाने वुमन्स प्रीमियर लीगच्या इतिहासात दुसऱ्यांदा अंतिम फेरीत धडक मारली आहे. मुंबईने एलिमिनेटर सामन्यात गुजरातला ऑल आऊट करत ४७ धावा आणि ५ चेंडू शिल्लक ठेवत पराभव केला. यासह मुंबई इंडियन्सने दुसऱ्यांदा WPL च्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. या संपूर्ण सामन्यात मुंबई इंडियन्सने उत्कृष्ट कामगिरी करत विजय मिळवला. मुंबईने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना WPL च्या प्लेऑफमधील मोठी धावसंख्या उभारली. यानंतर गोलंदाजीत मुंबईने भेदक गोलंदाजी करत गुजरातला सामन्यात पुनरागमन करण्याची संधी दिली नाही.**



मुंबई इंडियन्स आता WPL 2025 च्या अंतिम फेरीत दिल्ली कॅपिटल्सविरूद्ध भिडणार आहे. मुंबई संघाचे एलिमिनेटर सामन्यात सर्वच खेळाडू चांगल्या फॉर्मात होते. त्यामुळे अंतिम सामना अटीतटीचा होणार आहे. मुंबईचा एलिमिनिटेर सामना पाहण्यासाठी मुंबई इंडियन्सच्या आयपीएल संघाचे खेळाडू आणि स्टाफ तिलक वर्मा, हार्दिक पंड्या आणि कायरन पोलार्ड यांनी उपस्थिती लावली होती.मुंबईने दिलेल्या २१४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातची सुरूवात खूप खराब झाली. गुजरातचा संघ १९.२ षटकांत १६६ धावा करत सर्वबाद झाला. गुजरातकडून पहिल्याच षटकात बेथ मुनी ६ धावा करत बाद झाली. तर हरलीन देओल ८ धावा करत धावबाद झाली. तर डॅनियल गिब्सनदेखील ३४ धावांवर धावबाद झाली. तर हिलीने एश्ले गार्डनरला ८ धावांवर क्लीन बोल्ड केले. फिबी लिचफिल्ड आणि भारती फुलमाली यांनी चांगली भागीदारी रचली, पण मुंबईच्या संघाने त्यांना सामन्यात पुनरागमन करण्याची संधी दिली नाही.फिबी लिचफिल्ड ३१ धावा, भारती फुलमाली ३० धावा करत बाद झाली. तर काश्वी गौतमही धावबाद झाली. यासह गुजरातने ३ विकेट्स धावबाद करत गमावले. यानंतर अखेरच्या षटकांमध्ये गुजरातने झटपट ३ विकेट्स गमावले आणि मुंबईने शानदार विजय नोंदवला. मुंबईकडून हिली मॅथ्यूजने ३ विकेट्स, अमेलिया करने २ विकेट्स आणि शबनम इस्माईल आणि नताली स्किव्हर ब्रंटने १-१ विकेट मिळवली.

### देओल 8 धावा करत धावबाद

गुजरातकडून दुखापत झालेल्या डिएंड्रा डॉटिनच्या जागी संघात सामील केलेल्या डॅनिएल गिब्सनच्या जागी ४ षटकांत २ विकेट्स घेतल्या तर काश्वी गौतमनै १ विकेट घेतली. संघाची कर्णधार एश्ले गार्डनर हिने तिच्या स्पेलमधील ४ षटकं पूर्ण न केल्याचा फटका संघाला बसला. गार्डनरने २ षटकांत १५ धावा दिल्या.फिबी लिचफिल्ड ३१ धावा, भारती फुलमाली ३० धावा करत बाद झाली. तर काश्वी गौतमही धावबाद झाली. यासह गुजरातने ३ विकेट्स धावबाद करत गमावले. यानंतर अखेरच्या षटकांमध्ये गुजरातने झटपट ३ विकेट्स गमावले आणि मुंबईने शानदार विजय नोंदवला. मुंबईकडून हिली मॅथ्यूजने ३ विकेट्स, अमेलिया करने २ विकेट्स आणि शबनम इस्माईल आणि नताली स्किव्हर ब्रंटने १-१ विकेट मिळवली.गुजरातकडून पहिल्याच षटकात बेथ मुनी ६ धावा करत बाद झाली. तर हरलीन देओल ८ धावा करत धावबाद झाली.

# हॅरी ब्रुकवर आयपीएलमध्ये २ वर्षांची बंदी!

## हॅरी ब्रूकचा जागी दिल्ली कॅपिटल्स बंदी खेळाडूची घोषणा करेल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएल २०२५ अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. पण यादरम्यान बीसीसीआयने मोठा निर्णय घेतला आहे. आयपीएलदरम्यान विदेशी खेळाडू अनेकदा सीझन सुरू होण्यापूर्वीच कोणत्या ना कोणत्या कारणामुळे माघार घेतात. यामुळे संघांचे बरेच नुकसान होते. हे टाळण्यासाठी बीसीसीआयने लिलावापूर्वीच काही नियम ठरवले होते. आता त्याचा परिणामही दिसून येत आहे. बीसीसीआयने आता इंग्लंडच्या हॅरी ब्रुकवर आयपीएलमधून दोन वर्षांची बंदी घातली आहे. यादरम्यान तो आयपीएल लिलावातही सहभागी होऊ शकणार नाही.**



यंदाच्या आयपीएलसाठी लिलावासाठी हॅरी ब्रुकने आपलं नाव नोंदवलं होत. यानंतर त्याचे नाव शॉर्टलिस्ट करण्यात आले आणि त्याच्या नावावर बोलीही लावण्यात आली. दिल्ली कॅपिटल्सने त्याला ६.२५ कोटींमध्ये आपल्या संघात घेण्यात यश मिळविले. मात्र आयपीएलचा हंगाम जवळ येताच हॅरी ब्रूकने आपले नाव मागे घेतले. हॅरी ब्रूकने सलग दुसऱ्या वर्षी असा निर्णय घेतला आहे. यावेळी हॅरीने त्याच्या राष्ट्रीय वचनबद्धतेचे कारण देत माघार घेतली आहे. आता हॅरी ब्रूक आणखी दोन वर्षे आयपीएल खेळू शकणार नाही. इंडियन एक्स्प्रेसमधील वृत्तानुसार बीसीसीआयने याबाबत ईसीबी म्हणजेच इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाला माहिती दिली आहे. बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याच्या हवाल्याने अहवालात म्हटले आहे की, बीसीसीआयने नियमानुसार हॅरी ब्रुकवर बंदी घातली आहे. हॅरी ब्रुकसह याची माहिती इंग्लंड क्रिकेट बोर्डाला देखील देण्यात आली.आयपीएलच्या अनेक संघांना खेळाडूंच्या अशा वागण्याचा त्रास सातत्याने होत होता. आयपीएल लिलावासाठी खेळाडू आपली नावं द्यायचे आणि त्यांची निवड झाल्यावर कुठल्या ना कुठल्या कारणाने ते या स्पर्धेतून आपली माघार घेत असत. हे एकदा नाही तर अनेक वेळा घडले आहे. संघांनी आयपीएल २०२५च्या लिलावापूर्वी बीसीसीआयला याची माहिती दिली. यानंतर बीसीसीआयने नवा नियम तयार केला.

### अक्षर पटेलला संघाचे नेतृत्त्व

नियमामध्ये बीसीसीआयने स्पष्ट केले की हंगामापूर्वी कोणत्याही खेळाडूने जर माघार घेतली त्याच्यावर दोन वर्षांची बंदी घालण्यात येईल. गेल्या वर्षी झालेल्या लिलावापूर्वीच सर्व खेळाडूंना याची माहिती देण्यात आली होती. यासह हॅरी ब्रुकने माघार घेताच बीसीसीआयच्या या निर्णयानुसार आयपीएलमधून बंदी घातली जाणारा पहिलाच खेळाडू ठरला आहे.हॅरी ब्रुकने दिल्ली कॅपिटल्स संघाला २०२४ च्या आयपीएलमध्ये आजीच्या निधनामुळे माघार घेतली होती. तर यंदा २०२५ च्या आयपीएलमध्येही त्याने माघार घेतली. २०२४ मध्येही दिल्ली कॅपिटल्सने त्याला मोठ्या किंमतीत संघात सामील केलं होत. विकत घेतले होते. आता लवकरच हॅरी ब्रूकचा जागी दिल्ली कॅपिटल्स बंदी खेळाडूची घोषणा करेल.यंदाच्या आयपीएलसाठी लिलावासाठी हॅरी ब्रुकने आपलं नाव नोंदवलं होत. यानंतर त्याचे नाव शॉर्टलिस्ट करण्यात आले आणि त्याच्या नावावर बोलीही लावण्यात आली. दिल्ली कॅपिटल्सने त्याला ६.२५ कोटींमध्ये आपल्या संघात घेण्यात यश मिळविले. मात्र आयपीएलचा हंगाम जवळ येताच हॅरी ब्रूकने आपले नाव मागे घेतले. हॅरी ब्रूकने सलग दुसऱ्या वर्षी असा निर्णय घेतला आहे. यावेळी हॅरीने त्याच्या राष्ट्रीय वचनबद्धतेचे कारण देत माघार घेतली आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

। शुक्रवार ।
। दि. 14 मार्च 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## महिलांच्या योगदानाचा सन्मान व्हावा

# महिला सक्षमीकरणासाठी ‘ती’च्या प्रयत्नांना प्रोत्साहन!

## पिंपरी चिंचवड महापालिका; आकुर्डी येथील ग.दि. माडगुळकर नाट्यगृहात कार्यक्रमांचे आयोजन



**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**महिलांच्या योगदानाचा सन्मान व्हावा तसेच त्यांच्या सक्षमीकरण आणि सशक्तीकरणासाठी आवश्यक असलेल्या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक महिला दिन साजरा करणे महत्वाचे आहे. सर्व महिला वर्गाने एकत्र येऊन समानता आणि न्यायाच्या दिशेने काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक महिला स्वतंत्र, सुरक्षित आणि सशक्त होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी केले तसेच सर्व महिला भगिनींना जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आकुर्डी येथील ग.दि. माडगुळकर नाट्यगृह येथे जागतिक महिला दिनानिमित्त महापालिकेच्या महिला कर्मचाऱ्यांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमास उपआयुक्त संदीप खोत, सिताराम बहुरे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी तथा मध्यवर्ती महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा उज्वला गोडसे, लेखाधिकारी चारुशीला जोशी, प्रशासन अधिकारी साधना बोर्डे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, कार्यकारी अभियंता अनघा पाठक, वैशाली ननवरे, संध्या वाघ, जाहिरा मोमीन, अनुश्री कुंभार, लघुलेखक सुनिता पळसकर, वैशाली गायकवाड यांच्यासह कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष शशिकांत उर्फ बबन झिंजुर्डे, उपाध्यक्षा सुप्रिया सुरगुडे, संघटिका शुभांगी चव्हाण, रुपाली कड, माध्यमिक शिक्षण पतसंस्थेच्या चेअरमन सुरेखा मोरे तसेच लेखाधिकारी चारूशीला जोशी, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, मुख्य लिपिक संजय घुले, लिपिक रितिका बिडकर, आरती खैरे, पियुषा बिराडे, श्रुती कदम, सुनिता दिलोत, अरविंद कांबळे, रत्नाकर कणसे, रोहित डोईफोडे, नंदकुमार इंदलकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक चारुशीला जोशी यांनी तर सुत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक आणि विजया सोळंके यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार प्रमोद जगताप यांनी मानले.

### समूह नृत्य, फॅशन शो, सोलो डान्सने रंगत

या कार्यक्रमाची सुरुवात महापालिकेच्या कर्मचारी महिलांच्या गुणदर्शन कार्यक्रमाने करण्यात आली. यामध्ये स्थापत्य विभागाच्या महिला कर्मचारी वर्गाने शिवकन्या या गाण्यावर समुह नृत्य सादर केले. तर लेखा विभागाच्या महिला कर्मचाऱ्यांनी पैठणीचा फॅशन शो करून उपस्थितांची मने जिंकली तसेच सोलो डान्स देखील यावेळी महिलांनी सादर केला.

> “ आजचा दिवस केवळ महिलांच्या सशक्तीकरणासाठीच नसून त्यांची प्रेरणा आणि त्यांचे योगदान समाजाच्या सर्व अंगांमध्ये समाविष्ट करण्यासाठी महत्वपूर्ण संदेश आहे. महिला वर्गाने घर, संसार, ऑफिस सांभाळून आपल्या अंगातील कलागुणांना वाव द्यायला हवा, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.
>
> **–चंद्रकांत इंदलकर,** -अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

EDUCATING **MIND & HEART**

## ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26

# Holistic Empowering Learning

IT ALL **STARTS HERE**



**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION

**55+** NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS

**11+** CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA

**17K+** 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES

**600+** TEACHING AND NON TEACHING STAFF

**13K+** 13,000 ALUMNI ACROSS GLOBE

**PRIYADARSHANI** GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!